बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली स्थित चंद्रपूर या केंद्राचे प्रशासकीय नियंत्रण महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडे संपूर्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.बांबूसा-२०१७/प्र.क्र.३१९/फ-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-२२ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१. शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र. इएसटी-२०१३/प्र.क्र.६४/फ-९, दिनांक ०४ डिसेंबर, २०१४
२. शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र. बांबूसा-२०१५/प्र.क्र.१३९/फ-९, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१६
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचे क्र.व्यसं/मबांविमं/प्र.क्र.२०/८१/१७-१८, दिनांक २९.०८.२०१७
४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एफडीएम-२०१७/प्र.क्र.१२४/फ-२, दिनांक ०७ सप्टेंबर, २०१७
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.भावसे/प्रस्ताव/प्र.क्र.१(१६-१७)/कक्ष-९/१७३५/१७-१८, दिनांक १३.०९.२०१७
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.भावसे/प्रस्ताव/प्र.क्र.१(१६-१७)/कक्ष-९/२०१७/१७-१८, दिनांक १६.१०.२०१७

प्रस्तावना :-

महाराष्ट्रातील वनक्षेत्रापैकी जवळ-जवळ १३% क्षेत्रावर बांबू आढळतो. राज्यात जवळपास २,३०,००० मे.टन इतके बांबूचे उत्पादन असून त्यापैकी सुमारे ९०% पेक्षा जास्त बांबू गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयात मिळतो. नैसर्गिक व खाजगी क्षेत्रात बांबू लागवड व योग्य व्यवस्थापन करुन बांबूच्या उत्पादनामध्ये तसेच बांबूवर आधारीत उद्योजकांना चालना देणे व बांबूचा मुल्यवर्धीत उपयोग वाढवणेकरीता नवीन बांबू धोरण संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आलेले आहे. त्यानुसार चिचपल्ली, जि.चंद्रपूर येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे.

०२. बांबू क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने त्यावर विशेष लक्ष देण्याकरीता एक वेगळी स्थायत्त संस्था स्थापित करणे आवश्यक असल्याने संदर्भाधिन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये नागपूर येथे महाराष्ट्र राज्य बांबू विकास मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. मंडळाच्या सर्वसाधारण कार्यामध्ये बांबू विषयक धोरण, योजना व कार्यपध्दती सुसंगतपणे राबविण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करणे, मूल्यवर्धीत उद्योगासाठी आवश्यक उपचारित बांबू उपलब्ध करुन देणे, मूल्यवर्धीत वस्तु निर्मितीकरिता इच्छुक लोकांना प्रशिक्षण देणे, बांबूच्या मूल्यवर्धीत वस्तु निर्मितीमध्ये वाढ करणे, ग्रामिणस्तरावर निर्मित मूल्यवर्धीत वस्तुंचे योग्य प्रकारे विपणन करण्यास यंत्रणा उभी करणे, बांबू संदर्भात परिसंवाद, संमेलन, उद्योजक मेळावे, प्रदर्शने, प्रशिक्षणाचे आयोजन करणे, तसेच अन्य यंत्रणाद्वारे आयोजित केलेल्या समरुप कार्यक्रमात सहभागी होणे, चिचपल्ली जिल्हा चंद्रपूर

येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रात बांबू कारागीर यांना प्रशिक्षण देऊन उद्योजकांच्या समन्वयाने रोजगार निर्मिती वाढविणे इत्यादी प्रशिक्षणा संदर्भात बाबींचा समावेश आहे.

०३. बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली स्थित चंद्रपूर यांचे कार्यालया मार्फत बांबू संबंधित प्रशिक्षण व संशोधन कार्यक्रम सध्यस्थितीत सुरु आहे. आतापर्यंत या केंद्रातून जवळपास २०० लाभार्थी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. आता बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली येथे नविन प्रशिक्षण केंद्र निर्माणाधिन असून यावर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) चंद्रपूर यांची देखरेख होत आहे. भविष्यात या प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षण व संशोधन यांचे प्रशासकीय नियंत्रण महाराष्ट्र बांबू विकास मंडळ यांचेकडून करणे योग्य राहील अशी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांनी संदर्भाधिन क्र.३ च्या पत्रान्वये शिफारस करुन विनंती केली आहे.

०४. बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली स्थित चंद्रपूर हे प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचेकडे हस्तांतरीत केल्यावर निधी वितरणाची कार्यप्रणाली बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली या कार्यालयास सद्य:स्थितीत ज्या पध्दतीने अनुदान वितरण कार्यप्रणाली सुरु आहे. ती यापुढेही अनुदान वितरण प्रणालीची प्रक्रिया कार्यरत राहील. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित केल्यानंतर निधी वितरणाच्या कार्यप्रणालीत बदल करुन बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली स्थित चंद्रपूर यांना त्यांचेमार्फत अनुदानाचे वाटप करता येईल, असे संदर्भाधिन क्र.६ च्या पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी शिफारशीसह विनंती केलेली आहे. संदर्भाधिन क्र.४ च्या शासन निर्णयान्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार बांबू धोरणाची व्यापक अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली, जि.चंद्रपूर या केंद्राचे प्रशासकीय नियंत्रण महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडे हस्तांतर करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

बांबू क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून बांबू व बांबूवर आधारीत लघुउद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने तसेच शास्त्रोक्त पध्दतीने बांबू लागवड व औद्योगिक वापरासाठी व प्रसार करण्यासाठी संदर्भाधिन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य बांबू विकास मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. या मंडळाच्या सर्वसाधारण कार्यामध्ये चिचपल्ली चंद्रपूर येथे बांबू कारागीर यांना प्रशिक्षण देऊन उद्योजकांच्या समन्वयाने रोजगार निर्मिती वाढवणे हे कार्य आहे. मंडळाचे हे कार्य पाहता बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली, जि.चंद्रपूर या केंद्राचे प्रशासकीय नियंत्रण महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडे हस्तांतर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२२१६३१३३२८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.11.22 16:35:01 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) महाराष्ट्र राज्य, पुणे
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ट वनोपज), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक सर्व
९. विभागीय आयुक्त (सर्व महसूल विभाग)
१०. आयुक्त, आदिवासी विभाग
११. जिल्हाधिकारी (सर्व)
१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ,नागपूर
१३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व
१४. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१५. सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
१६. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१७. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१८. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)